शिल्पकार विकासाचा...
# देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
02 Aug 2026 - Page 4 B

# भालोद येथे पालक सभेत सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम



**भालोद, ता.यावल । वार्ताहर**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि Quick Heal Foundation यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या ’ऊलशी ड्ढळज्ञीहर षी ऊलशीडींरज्ञीहर या प्रकल्पांतर्गत येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित पालक सभेमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घे ण्यात आला.या कार्यक्रमाचे नियोजन विद्यापीठाच्या वि द्यार्थी स्वयंसेवक टीना पाटील आणि दर्शना चौधरी यांनी केले.कार्यक्रमात डिजिटल युगात वाढत असलेल्या साय बर गुन्ह्यांविषयी पालकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.मोबाईलवर येणाऱ्या संशयास्पद लिंक, OTP फसवणूक, ऑनलाइन आर्थिक फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, मजबूत पासवर्ड तयार करण्याची पद्धत, द्वि-स्तरीय प्रमाणीकरण, फोटो मॉर्फिंग, बनावट ॲप्स, तसेच सायबर गुन्हा घडल्यास त्वरित तक्रार कशी करावी याबाबत सोप्या भाषेत माहिती देण्यात आली.

यावेळी पालकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. दैनंदिन जीवनात सायबर सुरक्षे च्या नियमांचे पालन केल्यास ऑनलाइन फसवणुकीपा सून  स्वतःचे व कुटुंबाचे संरक्षण करता येते, असा संदेश देण्यात आला.

सायबर सुरक्षित समाज घडविण्याच्या उद्देशाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि Quick Heal Foundation यांच्या माध्यमातून विविध शाळा महाविद्यालये व समाजामध्ये सातत्याने जनजागृती उप क्रम राबविण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.